# ओएनजीसी (डब्ल्यूओयू) कर्मचारी संघटना

मान्यताप्राप्त युनियन

बंधू भगिनींनो,

मा. श्री. विजयराज (जी.एम.) हे MOU Review कमिटीमधील एक प्रमुख अधिकारी असून, अत्यंत महत्वाच्या मिटींगकरीता ग्रीन हाईट्स, मुंबई येथे दि. १७ एप्रिल २०१८ रोजी आले असता कर्मचारी संघटनेने त्यांची भेट घेवून त्यांच्या निदर्शनास आणून दिले होते कि, MOU 2004 बाबतच्या निर्णयास मॅनेजमेंटकडून विलंब होत असल्याकारणाने कामगारांमध्ये दिवसेंदिवस असंतोष वाढत चाललेला आहे. त्याचप्रमाणे हेही निदर्शनास आणून दिले कि, गेली अनेक वर्षे कर्मचारी संघटना या अन्यायाविरुध्द प्रामाणिकपणे संघर्ष करीत असून यातून सन्माननीय तोडगा निघावा यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व बाबी व संबंधीत कागदपत्रांची मॅनेजमेंटकडे पूर्तता केलेली आहे व मॅनेजमेंटने देखिल MOU 2004 मध्ये सुधारणा करण्यासाठी कमिटीचे गठन केले. परंतू MOU Review बाबतच्या अंतिम निर्णयास विलंब होत असल्याने कर्मचारी संघटनेनेच्या विश्वासार्हता व प्रामाणिकपणावर प्रश्नचिन्ह उठू लागले आहेत. MOU Review कमिटीचा अंतिम निर्णय होत नसल्याने कर्मचारी संघटनेने वेळोवेळी आंदोलनाचा इशारा दिला असता मॅनेजमेंटने आंदोलन मागे घेण्याची विनंती करीत प्रत्येकवेळी तातडीने मिटींगचे आयोजन केले. व सर्व चर्चेनंतर मा. श्री. विजयराज यांनी मे च्या पहिल्या आठवड्यात मिटींगचे आयोजन करण्याबाबत आश्वासन दिले.

वरीलप्रमाणे दिलेल्या आश्वासनानुसार 3 मे रोजी डेहराडून येथे MOU च्या मिटींगचे आयोजन करुन त्यात आपल्या मागण्यांसाठी मॅनेजमेंटने तत्वतः मान्यता दिली. ज्याचे विस्तृत पत्र ksmumbai.com या आपल्या साईटवर उपलब्ध आहे. यावेळी मॅनेजमेंट निर्णायक स्थितीमध्ये असल्यामुळे सर्वांच्या सहमतीने MOU चा अंतिम ड्राफ्ट बनविण्याच्या तयारीत होती. त्याचप्रमाणे बहूसंख्य नेतेमंडळीसुध्दा सदर MOU वर सह्या करुन दीर्घकाल चाललेला हा विषय सन्माननीय तोडगा काढून संपविण्याच्या मनस्थितीत होती. मात्र यावेळी दोन विभागातील नवनिर्वाचित जनरल सेक्रेटरी यांनी मॅनेजमेंटला विनंती केली कि, आमची हि पहिलीच मिटींग असून मागील काहीच संदर्भ माहित नसताना पहिल्याच मिटींगमध्ये या MOU वर सह्या करणे आम्हांस उचीत वाटत नसून आम्ही आमच्या कर्मचाऱ्यांना जी आश्वासने दिलेली आहेत त्यांची पूर्तता होणे आम्हाला अपेक्षीत आहे. मॅनेजमेंटने त्यांना स्पष्ट कल्पना दिली कि, आपण कर्मचाऱ्यांना दिलेल्या आश्वासनांनुसार मॅनेजमेंट आपले निर्णय घेत नसून कमिटीने आतापर्यंत केलेल्या कामकाजानुसारच अंतिम निर्णय घेण्यात येईल. या दोन नवनिर्वाचित नेत्यांनी 15 दिवसांच्या मुदतीसाठी विनंती केली ती मॅनेजमेंटने मान्य करुन पूढे 15 दिवसात मिटींगचे आयोजन करण्याची जाहीर केले.

मागिल मिटींगमध्ये ठरल्याप्रमाणे साधारण 25 मे च्या आसपास MOU Review च्या मिटींगचे आयोजन करण्याचे सर्वांनुमते ठरविले होते. मात्र MOU Review चा अंतिम निर्णय होवू नये यासाठी वारंवार अडथळे आणण्यात स्वारस्य असणाऱ्या पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियनने वरील साऱ्या घडामोडींचा अंदाज घेत मुंबईत दोन नव्याने उदयास आलेल्या युनियन्सना सोबत घेवून मॅनेजमेंट व लेबर कमिशनरच्या माध्यमातून अत्यंत घाईघाईने निवडणूकीचे नोटीफीकेशन जाहीर करुन निवडणूकीचे शेड्यूल देखिल ठरवून जाहीर केले. MOU Review चा निर्णय अंतिम टप्प्यामध्ये असून 25 मेच्या आसपास होणाऱ्या मिटींगमध्ये त्यावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता होती. त्यामुळे या महत्वाच्या मिटींगनंतर निवडणूकीचे आयोजन केले असते तर फरक काहीच पडणार नव्हता. परंतू MOU चा अंतिम निर्णय होण्याआधी निवडणूका घेण्याचा जाणिवपूर्वक खोडसाळपणा केलेला आहे, त्यामुळे त्यांनी कामगारांची सहानुभूती तर गमावली आहेच, परंतू स्वतःच्याच पायावर धोंडा मारुन घेतलेला आहे. गेल्या चार वर्षात स्वतः काहीही न करता केवळ प्रत्येक चांगल्या कामामध्ये खो घालण्याचे यांनी जी कामे केलेली आहेत ती कामगारांच्या नजरेतून सुटलेली नसून, या मंडळींना निश्चितपणे त्याची किंमत मोजावी लागणार आहे.

ज्या मंडळींनी या MOU 2004 वर सह्या करुन 2004 साली निवडूंगाची बीज रोवली त्यांना निवडून दिल्यास त्याच निवडूंगाच्या झाडांवर ते गोड रसाळ फळे उगविण्याचा चमत्कार करुन दाखवणार आहेत. व त्याप्रमाणे कामगारांना आश्वासने देखिल देत आहेत. त्यांची भक्तमंडळी देखिल निवडूंगाच्या झाडांवर गोड फळे येवू शकतात यावर फाजील विश्वास ठेवित इतर कामगारांच्या गळी उतरविण्याचा केविलपणा प्रयत्न करीत आहेत. परंतू येणारा काळच या साऱ्या बनवाबनवीला उत्तर देणारा असेल.

निवडणूका होत रहातील, हार-जीत ही होतच राहील. परंतू कोणत्या थराला जावून आणि आपली विवेकबुध्दी गहाण ठेवून आपल्या आस्तित्वासाठी आपण कामगारांचे नाहक नुकसान करीत आहोत याचे भान प्रत्येक युनियनच्या नेतेमंडळींनी ठेवणे आवश्यक आहे.

MOU मध्ये होणारी सुधारणा हि Retrospective करण्यास मॅनेजमेंटचा विरोध आहे असे त्यांची भक्तमंडळी ठामपणे सांगत आहेत. आम्ही आपणास सांगू इच्छितो कि, **या MOU मध्ये होणारी सुधारणा व मिळणारे लाभ हे Retrospective च असणार आहेत. निर्विवादपणे Retrospective च असणार आहे.** आणि या बाबतीत कर्मचारी संघटना कोणत्याही प्रकारची तडजोड करणार नाही. कामगारांच्या हिताचे निर्णय घेताना कर्मचारी संघटना कामगारांचा फायदाच होईल हे कटाक्षाने पहात आलेली आहे यात दुमत असू नये.

निवडणूकीसंदर्भात कर्मचारी संघटनेने शनिवार दि. २६ मे २०१८ रोजी सकाळी 11.00 वा. ११ हाय येथील सभागृहामध्ये मिटींग आयोजित केली आहे. सर्व संबंधितांनी उपस्थित रहावे, हि विनंती.

**आपला नम्र,**

दि. २३/५/२०१८

**(प्रदीप मयेकर)**
**सरचिटणीस**

**कामगार एकता झिंदाबाद !**

**कर्मचारी संघटना झिंदाबाद !!**

## कर्मचारी संघटनेची निशाणी - हेलिकॉप्टर

